The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# समाजविचार परिवर्तनात संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगाची भूमिका

**डॉ.गजानन आनंता देवकर,**
**मराठी विभाग, कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर महाविद्यालय उमरी जि नांदेड**

**प्रस्तावना**: संत नामदेवांनी भागवत धर्माचा पताका पंढरपूरपासून पंजाब पर्यंत पोहोचला समाजाच्या परिवर्तनात नामदेवांच्या अभंगाचे खूप मोठे योगदान आहे तत्कालीन समाजव्यवस्थेला संत नामदेवांच्या अभंगाने सामाजिक क्रांतीची दिशा दिली. समाज विचारांमध्ये संत नामदेवांच्या अभंगांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजामध्ये निर्माण झालेल्या रूढी, परंपरा,अंधश्रद्धा यांचे निर्मूलन करण्याचे काम संत नामदेवांनी केलेले आहे. संत नामदेवांच्या विचारांमध्ये समाजपरिवर्तनाची बीजे आढळून येतात. नामदेवांचे अभंग समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य केले आहे. नामदेवांनी अभंगाच्या माध्यमातून समाजाला परिवर्तनाकडे घेऊन जाण्याचे काम केलेले आहे. संत ज्ञानदेवाने रचलेल्या वारकरी धर्माच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे कार्य संत नामदेवांनी केलेले आहे म्हणून वारकरी संप्रदायामध्ये संत नामदेवांचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

संत तुकाराम हे इ.सनाच्या सतराव्या शतकातील एक संत कवी होत. संत तुकारामांना वारकरी पंथाचे जगद्गुरु म्हणून ओळखले जातात. संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवून वारकरी संप्रदायाचा अखंड परंपरा निर्माण केलीसतराव्या शतकातील सामाजिक प्रबोधनाचे निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकतेवर प्रहार करणारे संत होत. संत तुकारामांच्या अभंगातून समकालीन अनेक प्रश्नवर प्रहार करून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडनेस संत तुकाराम यांचे योगदान खूप मोठे आहे. भागवत संप्रदायाचे इमारतीवर कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना लाभले. समाज विचार परिवर्तनात संत तुकारामयांच्या अभंगाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. समाज परिवर्तन करण्यासाठी संत तुकारामाचे अभंगांनी खूप मोठा ध्यास घेतलेला दिसून येतो. संत तुकारामांनी आपले अभंगातून जनसामान्यांच्या मुखामध्ये अखंड मानवतावादी मूल्यांची जोपासना झाली. बहुजन समाजाला जागृत करून सामाजिक परिवर्तन केले. समाज मनावर अंधश्रद्धेचा पगडा दूर करून नवा धर्म, नवी भाषा संत तुकारामांनी अभंगातून शिकविले. संत तुकारामांच्या अभंगांमध्ये समाज विचार परिवर्तनाचे अनेक संदर्भ दिसून येतात.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये **समाजविचार परिवर्तनात संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगाची भूमिका** या संदर्भात विवेचन केलेले आहे. संत तुकाराम यांच्या अभंगातून समाज विषयक विचार कसा व्यक्त झालेला आहे ते मी शोधनिबंधाच्या माध्यमातून मांडलेले आहे.

**समाजविचार परिवर्तनात संत नामदेव आणि संत तुकाराम यांच्या अभंगाची भूमिका:**

समाज विचार परिवर्तनात संत साहित्याची भूमिका खूप महत्त्वपूर्ण आहे अठरापगड जातीतील संतांनी एकत्र येऊन हे खूप मोठे महान कार्य केलेले आहे. दिशाहीन समाजाला दिशा दाखवण्याचे कार्य संतांनी केलेले आहे. संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, कर्ममेळा , कान्होपात्रा, जनाबाई, मुक्ताबाई , सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार इत्यादी संतांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. समाजविचार परिवर्तनात संत साहित्याने खूप मोठी भरीव कामगिरी केलेली आहे. संत विचारावर आधारित समग्र समाजाची वाटचाल चालू आहे, समाजविचार परीवर्तनात संत साहित्याची भूमिका समाजाच्या कल्याणासाठी आहे.

**समाजविचार परिवर्तनात संत नामदेव यांच्या अभंगाची भूमिका पुढील प्रमाणे:**

संत ज्ञानेश्वरांनी स्थापन केलेल्या वारकरी पंथाचा प्रसार करत असताना सर्व जातिधर्मातील अनुयायांना एकत्र आणून समतेचा, मानवतेचा संदेश दिला. जातिभेद विषमता नष्ट केली, स्त्री-पुरुष समानतेला प्राधान्य दिले. भागवत धर्माच्या भक्ती आंदोलनामध्ये सर्वांना सामावून घेतले.संत साहित्याने निर्गुण निराकार ईश्वराचे रूप कसे आहे ते सांगितले. अंधश्रद्धेला मूठमाती दिली, माणसातच देव असल्याचे सांगितले. समाजाचा विकास करायचा असेल तर समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक होते संत नामदेव महाराजांनी खूप मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली. वारकरी पंथाचा प्रसार-प्रचार करण्याचे कार्य त्यांनी अखंड भारत वर्षांमध्ये केले.

संत नामदेवांच्या अभंगामध्ये वर्णभेदाला तिलांजली दिलेली आहे. सर्वच ईश्वराचे लेकरे आहेत. कोणी श्रेष्ठ नाही तर कोणी कनिष्ठ नाही असे त्यांनी सुचविले. जगायचे असेल तर नामस्मरण करावे. नाम हेच सत्य आहे हे त्यांनी पटवून दिले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी दरी निर्माण होऊ नये असे त्यांनी पटवून दिले. समाजाची प्रगती करायची असेल तर समाजामध्ये परिवर्तन आणायचे असेल तर नामस्मरणाला महत्त्व द्यावे असे त्यांनी अभंगातून समाजाला उपदेश केलेला आहे.

“ब्राह्मण हो शूद्र वैश्य नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ।।
नामाविण गति नाहीं हो आणीक । वैकुंठनायक बोले मुखें ।।”[१]

समाजाच्या परिवर्तनात सामाजिक समता महत्त्वपूर्ण भूमिका बजावते असे त्यांनी दाखवून दिले. म्हणून सामाजिक परिवर्तनात संत नामदेवांचे अभंग मौलिक योगदान देणारे आहेत.

संत नामदेवाने समाजातील महापाप टाळायची असेल तर विठ्ठलाचे नामस्मरण करावे असे नमूद केले आहे. विठ्ठलाचे नामस्मरण केल्याने यम सुद्धा शरण येतील अशी अभिलाषा व्यक्त केली आहे. समाजाच्या उन्नतीकरिता समाजाला एकसंघ ठेवावे असे त्यांनी सुचविले. विठ्ठल भक्तीचे अनुसरण करावे असे प्रतिपादन केले. संत नामदेवांनी हा भाव पुढील अभंगातून व्यक्त केलेला आहे.

"आम्ही विठोबाचे दूत । यम आणूं शरणागत ।।
मुखे नाम हातें टाळी । महापापा करूं होळी ।। "[२]

वारकरी धर्माचे उपासक म्हणजे विठोबाचे दूत होत. विठोबाचे दूत असल्यामुळे जीव घेण्यासाठी आलेल्या यमालासुद्धा शरणागती पत्करावी लागेल. मुखामध्ये हरिनाम हातामध्ये टाळ घेऊन महापापांची होळी करू विश्वास त्यांनी व्यक्त केलेला आहे. वारकरी धर्माचे दैवत श्री विठ्ठलाचे रूप कसे आहे यासंदर्भात संत नामदेवांनी विचार सांगितलेला आहे,ते म्हणजे,

"दगडाची मूर्ती मानिला ईश्वर । परी तो साचार देव नव्हे।।
प्रस्तराचा देव बोलत भक्ताते।सांगते ऐकते मूर्ख दोंघे।।"[3]

निर्गुण निराकार परब्रह्माची श्रीविठ्ठल हे साकार रूप आहे, ती दगडाची मूर्ती म्हणजे देव नव्हे, तीत ज्योतीच्या निजज्योतीच्या साक्षात्कार श्री ज्ञानेश्वर महाराजांना झाला, तसाच नामदेवांनाही आपले सद्गगुरू विसोबा खेचर यांच्याकडून झाल्याचा साक्षात्कार त्यांनी नमूद केलेले आहे. समाजातील भेदाभेद संत नामदेवांनी अमंगळ मानलेले आहे. जातीच्या, धर्माच्या नावाखाली समाजामध्ये विषमता निर्माण होऊ नये असे त्यांनी सुचविले. या विश्वात जन्माला आलेली सर्वच वस्तू ह्या मंगलमय असतात, त्यांना अमंगल समजू नये अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. यासंदर्भात संत नामदेवाने असे म्हटले आहे की,"

कुश्चळ भूमीवर उगवली तुळशी । अपवित्र तियेसी म्हणों नये ।।
काक विष्टेमाजी जन्मे तो पिंपळ। तया अमंगळ म्हणों नये ।।
दासीच्या पुत्र राजपद आलें। उपमा मागील देऊं नये।।"[४]

समाजामध्ये सामाजिक समता प्रस्थापित व्हावी ही त्यांची महत्त्वाची भूमिका होती . घाणेरड्या ठिकाणी तुळशीच्या जन्म झाला म्हणून तुळशीला अपवित्र म्हणू नये कावळ्याच्या विष्ठेमधून पिंपळ जन्माला आले म्हणून त्याला अमंगळ म्हणू नये दासीच्या पुत्राला राजपद प्राप्त झाले तर त्याला मागील उपमा देऊ नये अशी सामाजिक समानता विषयक विचार संत नामदेवांनी आपल्या अभंगातून व्यक्त केलेले आहे.कीर्तनाच्या माध्यमातून जगामध्ये ज्ञानरूपी

दीप मी तेवढ ठेवीन. इतर सर्व बडबड व्यर्थ आहे. तिला मी फाटा देईन विठ्ठल आणि रखुमाई यांचे भजनी मुखाने करेन. अशी प्रतिज्ञा संत नामदेवांनी केलेली आहे. समाजामध्ये संत विचारांची आवश्यकता असल्याचे संत नामदेवांनी सांगितलेले आहे. समाजामध्ये अवनीती वाढल्यामुळे समाज हा विकासापासून दूर गेल्याचे त्यांनी सुचविलेले आहे समाजाला संत विचारांची नितांत गरज असल्याचे त्यांनी सांगितले आहे. समाजातील पापी लोकांना संत सांगती आवडत नाही. समाजातील लोभी माणसांना उदारवृत्ती आवडत नाही. व्याभिचारी स्त्री ला स्वतःचा पती आवडत नाही. उजेडला ज्योती आवडत नाही. चोरांना चांदणे आवडत नाही. समाजातल्या व्यक्तींना सदबुद्धी आवडत नाही. हेरांना सावधान आवडत नाही तर कुचर व्यक्तींना सत्य आवडत नाही. अशी अनेक उदाहरणे देऊन संत नामदेवांनी समाजामध्ये सामाजिक विचार प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. समाजामध्ये सामाजिक विचारांची गरज असल्याचे त्यांनी वेगवेगळे उदाहरणं देऊन पटवून दिलेले आहे.

“ पाप्या नावडे संतसंगति। लोधिया नावडे उदारवृत्ति।।
व्याभिचारिणीं नावडे पती । नावडे ज्योति उजियेडा ।।
चांदणें नावडे तया चोरा । सदबुद्धि ना आवडे रांडपोरा।।
सावधान नावडे तया हेरा । सत्य कुचरा नावडे ।।”[५]

समाजामध्ये वावरत असताना उपायापेक्षा अपायांना जास्त महत्त्व देतात, अशा माणसांची अधोगती होते. अशा माणसांची अधोगती येऊ नये म्हणून संत नामदेवांनी समाजाला मौलिक संदेश दिलेला आहे. माणसाने गाढवासारखे वर्तन करू नये असे सुचविले आहे.

**संत तुकाराम यांच्या अभंगवाणीतून समाज परिवर्तन विषयक विचार पुढील प्रमाणे**

**सामाजिक वास्तवता:-** संत तुकाराम यांच्या अभंगात सामाजिक वास्तवतेचे भान दिसून येते समाजामध्ये प्रगती साधण्यासाठी स्त्री आणि पुरुष यांचे योगदान सारखेच असायला हवे परंतु तसे घडत नसल्याचे चित्रण संत तुकारामाचे अभंगात दिसून येते समाजामध्ये स्त्री आणि पुरुष यांच्या संदर्भात चर्चा -अपचर्चा होतात परंतु त्यातली सत्यता शोधून काढली पाहिजे असे विचार संत तुकारामाच्या अभंगातून दिसून येतात जीवन आणि मानव यांचा समन्वय साधने आवश्यक आहे. भोंदू साधूच्या अंधश्रद्धेच्या मार्गी लागू नये. अंधविश्वासाचा बळी होऊ नये असे विचार संत तुकारामाच्या अभंगातून दिसून येतात झाडाला फुले फळे लागत नसतील, एखाद्या स्त्रीला मूल होत नसेल तर दोष कोणाचा, त्या ऋतूचा की त्या स्त्रीचा हे समजून घेणे आवश्यक आहे. परस्पर दोष देत बसू नये. संत तुकारामाच्या अभंगात यासंदर्भात पुढील अभंग महत्वपूर्ण आहे. जसे,

“ नाही निर्मळ जीवन । काय करील साबण।।

तैसी चित्त शुध्दि नाही । तेथे बोध करील काई।।
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंत काळ।।
वांजे न होती लेकुरे । काय करावे भ्रतारे।।
नपुंसका पुरुषांशी । काय करील बाईल त्यासी ।।
प्राण गेलिया शरीर । काय करील वेहार ।।"[६]

**व्यसनमुक्ती जनजागृती :** संत तुकाराम यांच्या अभंगांमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती विषयक विचार व्यक्त झालेले आहेत. मद्यपान व धुम्रपान करू नये असे विचार संत तुकारामाच्या अभंगातून प्रकट झालेले आहेत. व्यसनाधीनतेमुळे संसार उध्वस्त होऊन जाते, याची जाणीव मानवाने ठेवावी असे सूचित होते.

" पाने जो खाईल बैसोनि ।घडेल तयासी गोहत्या ते ।तमाखू ओढून काढील जो धूर।बुडेल ते घर तेणे पापे।" मनुष्याने व्यसनाधींच्या आहारी जाऊ नये. संसार सुखाचा करावा असा संदेश वरील अभंगातून दिसून येतो.

**पर्यावरण संवर्धन विषयक विचार:-**

संत तुकारामाच्या अभंगांमध्ये पर्यावरण संवर्धन विषयक विचार व्यक्त झालेले आहेत. पर्यावरणाचे संवर्धन करावे, पर्यावरणाचा नाश करू नये, मानव आणि निसर्ग यांचा अतूट संबंध आहे असे चित्र संत तुकाराम यांच्या अभंगातून आलेले आहे. पशुपक्षी, प्राणी, नाले, पर्वत,दरी-खोरे यांचे संरक्षण मानवाने केले पाहिजे हा महत्त्वपूर्ण संदेश तुकारामांच्या अभंगातून स्पष्ट होतो.

" वृक्ष वल्ली आम्हां सोयरीं वनचरें ।पक्षी ही सुस्वरें आळविती ।।
येणें सुखें रुचे एकांताचा वास ।नाही गुण दोष अंगा येत।।
आकाश मंडप पृथुवी आसन ।रमे तेथें मन क्रीडा करी ।।
कंयाकुमंडलु देहउपचारा ।जाणवितो वारा अवसरु ।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ।।
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांसी।।"[७]

**समाजातील ढोंगीपणावर प्रहार:-** समाजामध्ये उद्भवलेल्या ढोंगीपणावर संत तुकारामानी कठोर प्रहार केलेले आहेत. ढोंगी लोकांनी समाजाची पार वाट लावल्याची खंत संत तुकारामांच्या अभंगातून दिसून येते. तुकाराम जसे भावनाप्रधान कवी होते तसे ते परखड समाजसुधारक होते. वाममार्गाला जाणाऱ्या समाजाला त्यांनी सन्मार्ग दाखविला.

" पाया झाला नारू । तेथे न बांधला कापुरु।।
तेथे बिबव्याचे काम ।अधमासि तो अधम ।।

देव्हाऱ्यावर देवावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ।।
तेथे पैजारेचे काम । अधमासि अधम ।।
तुका म्हणे जाती। जातीसाटी खाती माती।।"[८]

जशास तसे वागावे असा संदेश या अभंगातून दिलेला आहे.

**संत संगतीची आवश्यकता:-** संत तुकारामाचे अभंग मध्ये संत संगती शिवाय पर्याय नाही असे स्पष्ट झालेली दिसून येते. समाजाचा कल्याण साध्य करायचे असेल तर संत संगती करावी असं निर्वाळा संत तुकाराम यांच्या अभंगातून आलेला आहे.संताची निंदा करणे म्हणजे यमाच्या घरी जाणे होय.संताची निंदा म्हणजेच पापात बुडणे असे प्रतिपादन केले आहे

" संत संगती ज्याचे घरी । नव्हे घर ते यमपुरी।।
त्याच्या पापा नाही जोडा । संगे जना होय पिडा।।
संत निंदा आवडे ज्यासी । तो जिता चि नर्कवासी।।"[९]

**भेदाभेद अमंगळ:-** संत तुकारामाचे अभंगांमध्ये सर्व धर्म सहिष्णुतेचे दर्शन घडते कोणत्याही प्रकारचे भेदाभेद होऊ नयेत, उच्च नीचता मानू नये असा संदेश संत तुकारामाचे अभंगातून दिसून येतो. सर्व वैष्णव भाऊ भाऊ आहेत कोणाचाही मत्सर होऊ नये असा संदेश त्यांच्या अभंगातून दिसून येतो.

" विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
अईका जी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।
कुणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्ण सर्वेश्वर पूजनाचे ।।"[१०]

**नारी सन्मानाची भूमिका:-** संत तुकारामाचे अभंगामध्ये नारी सन्मानाची भूमिका व्यक्त झालेली आहे. परस्त्रीला माते समान मानावे,पर स्त्रीचा अवमान करु नये.असा विचार संत तुकाराम यांच्या अभंगातून व्यक्त झालेले आहे

" पराविया नारी माऊली समान। मानलिया धन काय वेचे ।।
न करितां परनिंदा अभिलाष। काय तुमचे यास वेचे सांगा ।।"[११]

**समारोप:**समाज विचार परिवर्तनात संत नामदेवांचे अभंग खूप महत्त्वपूर्ण योगदान देणारे आहेत. समाजाच्या कल्याणासाठी संत नामदेवांचे अभंग सतत प्रेरणा देणारी आहेत. संत नामदेवांचे अभंगात सामाजिक व जीवनमूल्ये आढळून येतात. समाजाचे समग्रहित नामदेवांच्या अभंगात आहे.नैतिकतेची शिकवण संत नामदेवांच्या अभंगाने समाजाला बहाल केलेले आहे. संत तुकारामाचे अभंगामध्ये समाजाला प्रकाशाकडे घेऊन जाण्याचे विचार आढळून येतात. समाजातील अंधश्रद्धा, ढोंगी, बुवाबाजी, कर्मकांड आणि परंपरा यावर संत तुकारामाचे अभंग

परखडपणे ताशेरे ओढतात. समाज विचार परिवर्तनात संत तुकारामाचे अभंग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आहेत.

**संदर्भसूची-**

१.श्री नामदेव गाथा - अभंग क्र.७४१ ,पृष्ठ क्र २८४ प्रकाशक- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई पुनर्मुद्रणजून२००८
२. उपरोक्त अभंग क्र. ७३५,पृष्ठ क्र २७९
३. उपरोक्त प्रस्तावना ४२
४. उपरोक्त अभंग क्र.१२३९ , पृष्ठ क्र ५१३
५.नामा म्हणे- डॉ.हे.वि.इनामदार,स्नेहल प्रकाशन पुणे,पृष्ठ क्र.३२१, प्रथमावृती सप्टेंबर १९९९
६. श्री तुकारामबावांचा अभंगाची गाथा, शासकीय फोटो झिंको मुद्रणालय पुणे,
पुनर्मुद्रण १९७३ ,अभंग क्रमांक. ७६५, पृष्ठ क्रमांक १२७
७. उपरोक्त अभंग क्र. २४८१ ,पृष्ठ क्र ३५
८. उपरोक्त अभंग क्र. ४३७८ ,पृष्ठ क्र ५५४
९. उपरोक्त अभंग क्र. १६२७,पृष्ठ क्र २३१
१०. उपरोक्त अभंग क्र. ४६ ,पृष्ठ क्र२९
११. उपरोक्त अभंग क्र. ६१ ,पृष्ठ क्र३१